सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

काँग्रेसचे आत्मघातकी नेतृत्व;

## जालन्यात पक्षाच्या अधःपतनाला स्थानिक नेते जबाबदार

### यादव कुटुंबाचा भाजपकडे कल

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहर काँग्रेसमधील अंतर्गत वाद अखेर उघडकीस आला असून, निष्ठावंत नेते विनोद यादव व त्यांच्या भगिनी जागृती यादव यांच्या पक्ष त्यागामुळे काँग्रेसमधील गटबाजी, स्वार्थी राजकारण आणि चुकीच्या नेतृत्वाची पोलखोल झाली आहे. यादव कुटुंबाने काँग्रेसला सोडचिठ्ठी देत थेट भाजप प्रवेशाची घोषणा केल्याने शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

**काँग्रेस नेतृत्वाचा अपयशाचा आलेख**

गेल्या काही वर्षांपासून जालन्यात काँग्रेस सातत्याने पिछाडीवर जात आहे. निवडणुकांतील पराभव, कार्यकर्त्यांमधील असंतोष आणि नेतृत्वावरील अविश्वास यामुळे पक्षाची पकड सैल होत चालली आहे. याला सर्वस्वी स्थानिक नेतृत्व जबाबदार असल्याचा आरोप आता उघडपणे केला जात आहे.

विनोद यादव यांनी पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, अब्दुल रशीद पहेलवान, अतीक खान आणि कल्याण दळे यांच्यावर गंभीर आरोप करत काँग्रेसच्या अधःपतनाचा ठपका ठेवला आहे. हे नेते पक्षासाठी नव्हे, तर स्वतःच्या फायद्यासाठी राजकारण करत आहेत, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.

**निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलण्याची राजकीय खेळी**

काँग्रेसमध्ये दीर्घकाळ काम करणाऱ्या, जनाधार असलेल्या उमेदवारांना डावलून बाहेरून आयात केलेल्या नवख्या उमेदवारांना तिकीट देण्यात आले. यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला आणि पक्ष संघटनाच ढासळली.

तिकीट वाटपात पारदर्शकता नव्हती, पैसे आणि ओळखीच्या जोरावर उमेदवारी देण्यात आली, असा थेट आरोप यादव यांनी केला. यामुळे काँग्रेसचा दारुण पराभव झाल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

**बी-फॉर्म घोळ आणि अंतर्गत कारस्थान**

खासदार कल्याण काळे यांनी दिलेल्या मूळ उमेदवार यादीत स्थानिक नेत्यांनी मनमानी फेरफार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. बी-फॉर्म वाटपात जाणीवपूर्वक घोळ घालून निष्ठावंत उमेदवारांची तिकिटे कापण्यात आली.

यादव यांच्या मते, काँग्रेस संपवण्याची सुपारीच या नेत्यांनी घेतली आहे. यामागे मोठे आर्थिक व्यवहार आणि अंतर्गत राजकीय साटेलोटे असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला.

**वरिष्ठ नेतृत्वाचे मौन; दोषींना पाठीशी?**

या संपूर्ण प्रकरणात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांचे मौनही संशयास्पद ठरत आहे. वारंवार तक्रारी करूनही स्थानिक नेतृत्वावर कोणतीही कारवाई न झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

वरिष्ठ नेतृत्व जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे की काय? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर काँग्रेसला जालन्यातून पूर्णपणे हद्दपार व्हावे लागेल, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

**यादव कुटुंबाचा भाजपकडे कल - काँग्रेससाठी धोक्याची घंटा**



काँग्रेसमध्ये न्याय न मिळाल्याने अखेर विनोद यादव आणि जागृती यादव यांनी पक्षाचा राजीनामा दिला. लवकरच माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, कैलास गोरंट्याल आणि भास्करराव दानवे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये अधिकृत प्रवेश होणार आहे.

हा प्रवेश केवळ व्यक्तीगत राजकारण नसून, काँग्रेसविरोधातील नाराजीचे प्रतीक आहे. यादव कुटुंबाचा मोठा जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांची फौज भाजपसोबत गेल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

**काँग्रेसची घसरण - अंतर्गत शत्रूच मोठा**

काँग्रेसचे नुकसान बाहेरील पक्षांमुळे नव्हे, तर अंतर्गत नेतृत्वाच्या स्वार्थी धोरणांमुळे होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. संघटन मजबूत करण्याऐवजी गटबाजी, आर्थिक हितसंबंध आणि व्यक्तीपूजा सुरू असल्याने पक्ष रसातळाला जात आहे.

**आता तरी आत्मपरीक्षण होणार का?**

यादव कुटुंबाचा पक्षत्याग ही काँग्रेससाठी शेवटची इशारा घंटा आहे.

जर पक्षाने तात्काळः दोषी नेत्यांवर कारवाई, पारदर्शक तिकीट वाटप, निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय, संघटन बळकटीकरण, यासारखे कठोर निर्णय घेतले नाहीत, तर जालन्यात काँग्रेसचे अस्तित्वच धोक्यात येईल.

जालन्यातील काँग्रेसचे सध्याचे चित्र हे अपयशी नेतृत्व, अंतर्गत कटकारस्थान आणि स्वार्थी राजकारणाचे जिवंत उदाहरण आहे. विनोद यादव यांचा पक्षत्याग हा वैयक्तिक निर्णय नसून, काँग्रेसच्या अपयशावरचा मोठा शिक्का आहे.

आता प्रश्न इतकाच आहे, काँग्रेस नेतृत्व जागे होणार का, की पक्षाला जालन्यातून कायमचा निरोप द्यावा लागणार.

---

जालना महानगरपालिका निवडणूक: प्रभाग ९ मध्ये महावीर ढक्कांचा ‘रेकॉर्डब्रेक’ विजय!

## सुज्ञ मतदारांची विकासालाच साथ - ढक्का

### गुंडगिरीचा अंत मी केला; विश्वास तुटू देणार नसल्याचा जनतेला ढक्का यांचा शब्द

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मधून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार महावीर ढक्का यांनी ऐतिहासिक आणि रेकॉर्डब्रेक मताधिक्याने विजय मिळवत आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जालन्यातील टॉप ५ सर्वाधिक मते मिळविणाऱ्यांमध्ये स्थान मिळवत, ढक्का यांनी विरोधकांच्या सत्तेच्या गणितांना सुरुंग लावला आहे.

**विकासाचा विजय, अपप्रचाराचा पराभव**

विजयानंतर माध्यमांशी बोलताना महावीर ढक्का अत्यंत आक्रमक पवित्र्यात दिसून आले. आम्ही केवळ विकास, काम आणि विश्वास या त्रिसूत्रीवर निवडणूक लढवली. याउलट, विरोधकांनी जातीपातीचे राजकारण आणि खोटे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, पण सुज्ञ मतदारांनी विकासालाच साथ दिली, असे ढक्का यांनी ठणकावून सांगितले.



**विरोधकांवर गंभीर आरोपांची सरबत्ती**

यावेळी महावीर ढक्का यांनी आमदार अर्जुन खोतकर आणि विष्णू पाचफुले यांच्यावर थेट हल्लाबोल केला. ते म्हणाले की यांचे दारूचे अड्डे आहेत, हे लोक बनावट दारू विकतात. गोरगरिबांच्या लेआऊटवर कब्जा करणे आणि दोन नंबरचे धंदे करणे हीच यांची खरी ओळख आहे. जनतेने आता अशा प्रवृत्तींना घरचा रस्ता दाखवला आहे.

**गुंडगिरीचा अंत केल्याचा पुनरुच्चार**

ढक्का यांनी आपल्या भाषणात जुन्या काळाचा संदर्भ देत सांगितले की, मस्तगड भागातील गुंडगिरी मी २० वर्षांपूर्वीच संपवली होती, तर इन्कम टॅक्स कॉलनीतील दादागिरीला ९ वर्षांपूर्वीच पूर्णविराम दिला आहे. जनतेला सुरक्षितता हवी आहे आणि ती आम्ही दिली आहे.

**गोरंट्याल पिता-पुत्रांच्या सभांचा प्रभाव**

निवडणुकीच्या काळात माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि अक्षय गोरंट्याल यांनी प्रभाग ९ मध्ये घेतलेल्या चार जाहीर सभांनी निकालाचे पारडे ढक्का यांच्या बाजूने झुकवले. त्यांच्या आवाहनामुळे केवळ ढक्काच नव्हे, तर भाजपचे संपूर्ण पॅनल निवडून आल्याचा दावाही यावेळी करण्यात आला.

**मतदारांना दिला 'शब्द'**

जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो मी कधीही तुटू देणार नाही. प्रभाग ९ मधील रस्ते, पाणी, ड्रेनेज आणि स्वच्छतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी अहोरात्र नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध राहीन, असे भावनिक आवाहन ढक्का यांनी विजयानंतर केले.

एकूणच, प्रभाग ९ मध्ये महावीर ढक्का यांच्या रूपाने विकासाच्या राजकारणाचा विजय झाला असून, त्यांनी आपल्या विरोधकांना चारी मुंड्या चित करत जालन्याच्या राजकारणात आपले वजन वाढवले आहे.

---

## माहिती आयोगात दाखल प्रकरणांचा गतीने निपटारा

### छत्रपती संभाजीनगर खंडपीठाची उल्लेखनीय कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यात उल्लेखनीय यश मिळवले आहे. सन २०२४ मध्ये खंडपीठाने १४ हजार १ द्वितीय अपिले निकाली काढली असून, २०२५ मध्ये १० हजार ७८३ द्वितीय अपिलांचा यशस्वी निपटारा करण्यात आला आहे.



आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या निपटाऱ्याच्या प्रमाणात जवळपास दहापटीने वाढ झाली असून, द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेत सुमारे ५५ टक्क्यांची लक्षणीय घट झाली आहे.

राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या प्रभावी प्रशासकीय नियोजनामुळे आणि सातत्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. तक्रार निवारणात २०२५ मध्ये १० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. २०२४ अखेरीस प्रलंबित असलेल्या १६५ तक्रारींची संख्या डिसेंबर २०२५ अखेर ८५ वर आली असून, त्यामुळे प्रलंबित तक्रारींमध्ये ५१ टक्के घट झाली आहे.

द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेतही मोठी घट झाली आहे. २०२४ अखेरीस ८ हजार ६९९ द्वितीय अपिले प्रलंबित होती. ती संख्या डिसेंबर २०२५ अखेर ३ हजार ९४६ इतकी झाली असून, प्रलंबित अपिलांच्या प्रमाणात सुमारे ५५ टक्के घट झाल्याचे स्पष्ट होते.

राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाची ही कामगिरी माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस बळ देणारी ठरली आहे. पान २ वर

---

## माथेफिरू व्यक्तीकडून स्वतःच्या मोटरसायकलला आग, अनर्थ टळला

**जालना । प्रतिनिधी** - जुना जालना परिसरात पुन्हा एकदा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटर परिसरात काल दिनांक १७ शनिवार रोजी रात्री एका माथेफिरू व्यक्तीने थेट स्वतःच्या मोटरसायकलला आग लावून परिसरात दहशत निर्माण केली. भरवस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, विलास सुभाष हिवाळे असे या माथेफिरूचे नाव असून तो नेहमीच या भागात दारू पिऊन राडा करत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. घटनेच्या वेळी संबंधित व्यक्तीने आपल्या मोटरसायकलला पेटवून दिले. नागरिकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला असता त्याने नागरिकांशी अर्वाच्य भाषा वापरून शिवीगाळ केली, त्यामुळे संतप्त नागरिकांनी तात्काळ कदीम जालना पोलीस ठाण्यात घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी धावले. नागरिकांच्या मदतीने मोटरसायकलवर पाणी टाकून आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, आग लागल्यानंतर मोटरसायकलचे दोन छोटे स्फोट झाले असून, परिसरात लहान मुले नेहमी रस्त्यावर खेळत असल्याने मोठा अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुदैवाने वेळीच आग विझवण्यात आल्याने जीवितहानी टळली.

या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी जर मोठी दुर्घटना घडली असती तर याला जबाबदार कोण? असा थेट सवाल उपस्थित केला आहे. अशा माथेफिरू व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होईल, अशी तीव्र मागणी करण्यात येत आहे. पोलिसांनी विलास सुभाष हिवाळे याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. जुना जालना परिसरात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

---

महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र.१ मधून भास्कर दानवे यांचा विजयानंतर शिवाजीनगर म्हाडा कॉलनीत घरोघरी भव्य सत्कार

## हा जनतेचा विजय आहे - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भास्कर आबा दानवे यांनी मोठ्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. या ऐतिहासिक विजयानंतर छ.शिवाजीनगर म्हाडा कॉलनी परिसरात त्यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला. कॉलनीतील नागरिकांनी आणि विशेषतः महिलांनी दानवे यांचे औक्षण करत फुलांची उधळण व शुभेच्छांचा वर्षाव केला. या वेळी संपूर्ण परिसर जल्लोषात न्हाऊन निघाला, भास्कर आबा दानवे यांच्यासोबत नवनिर्वाचित नगरसेवक सुशीलाताई दानवे, कल्याण भदनेकर, ज्योती सले, पदमा मानधनी यांची उपस्थिती होती.

सत्कारप्रसंगी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. पान २ वर









# फंडात अडकले उमेदवार!

जालना शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला यात भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व स्थापित करत ६५ जागांपैकी ४१ जागांवर विजय मिळविला आहे. त्या खालोखाल शिवसेना १२, काँग्रेस ९, एमआयएम २ आणि अपक्ष एका जागेवर विजयी झाले आहेत. मात्र, शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार, वंचित बहुजन आघाडी, मनसे यांना साधे खातेही खोलता आले नाही ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. उद्धव ठाकरे यांची शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडी म्हणून निवडणुक लढविली होती. तरी देखील उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला एकही जागा मिळविला आली नाही. आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांनी मनसेसह युती करत वेगळी चूल मांडली होती. त्यांनाही एकाही जागेवर उमेदवाराला विजय मिळविता आला नाही. एकंदरीत उद्धव ठाकरेच्या शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी आणि वंचित आणि मनसेने उमेदवारांची निवड करतांनाच काही अंशी चुक केल्याचे राजकीय जाणकार म्हणत आहेत. दुसरीकडे पक्ष फंड येईल आणि प्रचारात आघाडी घेऊ या द्विध्येत यांच्या उमेदवारांचा बरासचा वेळ खर्ची झाला त्यातल्या त्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी तर त्यांच्या उमेदवारांना फंडासाठी हैराण केल्याचे अनेकांनी खाजगीत बोलतांना स्पष्ट केले आहे. मात्र, उमेदवारी दाखल केली आणि प्रचार सुरु असतांना ऐनवेळी राष्ट्रवादी अजित पवार यांच्या स्थानिक नेत्यांनी केलेली गोची यामुळे राष्ट्रवादीच्या जवळपास चार - पाच जागांवर त्यांना याचा फटका बसला आहे. यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे शहराचे स्थानिक नेते जबाबदार असल्याचे त्यांच्याच उमेदवारांचे म्हणणे आहे. त्यामुळे येत्या काळात स्थानिक नेत्यांमध्ये बदल करणे अथवा त्यांच्या वागण्यात बदल होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे महाविकास आघाडी झाली खरी मात्र, त्यांनी पॅनल टू पॅनल प्रचार करण्याऐवजी मला एक मत द्या बाकी तुम्ही तुमचे बघा अशा पद्धतीचा अवलंब केला त्यामुळे त्यांना याबाबीचा फटका बसला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही प्रभाग सोळा वगळता इतर प्रभागातही पॅनल टू पॅनल प्रचारावर भर दिला असता आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा घेण्यात आली असती तर चित्र वेगळे असते. मात्र, भारतीय जनता पक्षाने सर्वच आघाड्यावर बाजी मारली. प्रचारासाठी खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे जालन्यात आले. त्यातल्या त्यात माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी प्रभाग -प्रभाग पिंजुन काढला एका - एका प्रभागात यांनी चार-चार वेळा व्हिजीट देत सभा, रॅली, डोअर टू डोअर प्रचार आणि पॅनल टू पॅनल मतदान करवून घेण्यावर भर दिला आणि त्याचा परिणाम भाजपाच्या बहुतांश प्रभागात पॅनलच्या पॅनलचा विजय झाला. येत्या काही दिवसांत जालना महानगर पालिकेला पहिला महापौर मिळणार आहे. हा महापौर भास्कर दानवे, संगीता गोरंट्याल, सुशील दानवे, अक्षय गोरंट्याल यांच्यापैकी होतो की, अन्य हे दोन-चार दिवसांमध्ये स्पष्ट होईल.

पान १ वरुन

## माहिती आयोगात ...

राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठामार्फत प्रकरणांचा जलद व पारदर्शक निपटारा करण्यावर भर देण्यात आला आहे. नियोजनबद्ध कामकाज, सुनावणीतील शिस्त आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे प्रलंबित अपिले व तक्रारींच्या निपटाऱ्यात लक्षणीय प्रगती साधता आली आहे.

नागरिकांना माहिती अधिकार कायद्यांतर्गत वेळेत न्याय मिळावा, हाच आयोगाचा मुख्य उद्देश आहे. भविष्यातही प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील तसेच माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रकाश इंदलकर राज्य माहिती आयुक्त यांनी म्हटले आहे.

## हा जनतेचा ...

महिलांनी औक्षण करून प्रभागाच्या विकासासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत असा विश्वास व्यक्त केला. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विजयाचा आनंद साजरा केला.

या वेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास टाकला, तो मी कधीही तुटू देणार नाही. विकास थांबणार नाही. प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्ट्रीटलाईट, उद्याने तसेच महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा या सर्व बाबींना प्राधान्य दिले जाईल.ते पुढे म्हणाले की, प्रभागातील रखडलेली विकासकामे मार्गी लावली जातील. मूलभूत सुविधांबरोबरच शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जाईल. मला निवडून दिल्याबद्दल मी सर्व नागरिकांचा मनापासून आभारी आहे. हा विजय माझा नसून प्रभागातील प्रत्येक नागरिकाचा आहे. या कार्यक्रमास छ.शिवाजीनगर म्हाडा कॉलनीतील नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जल्लोष, घोषणाबाजी आणि अभिनंदनाच्या शुभेच्छांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### काश्मिरी हिंदूंच्या विस्थापनाचे भीषण वास्तव आणि ३६ वर्षांची भळभळती जखम !

# काश्मीरमधील जिहादी अत्याचारांचे आणि हिंदूंच्या वंशविच्छेदाचे ज्वलंत सत्य

१९ जानेवारी १९९० ! हे वर्ष आणि हा दिवस नुसता आठवला तरी आजही प्रत्येक काश्मिरी हिंदूचा थरकाप उडतो. पृथ्वीवरचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीर खोऱ्यात याच दिवशी माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली. ५ सहस्र वर्षांपूर्वीची काश्मीरची पुरातन आणि समृद्ध संस्कृती संपवण्यासाठी धर्मांध जिहादी शक्तींनी हिंदूंचा अक्षरशः वंशविच्छेद आरंभला. १९८९ पासूनच काश्मीरमध्ये दडपशाही आणि हिंसाचाराचे सत्र सुरु झाले होते, ज्याचा स्फोट १९ जानेवारी १९९० च्या त्या काळरात्री झाला. या दिवशी काश्मीर खोऱ्यातील सुमारे ४ लाख ५० हजार हिंदूंना, म्हणजेच तिथल्या एकूण लोकसंख्येच्या ९९ टक्के हिंदूंना आपल्याच देशात निर्वासित व्हावे लागले. केवळ अंगावरील वस्त्रांनिशी, स्वतःचे हक्काचे घरदार आणि कष्टाने कमावलेली संपत्ती सोडून त्यांना जीवाच्या आकांताने पलायन करावे लागले. जगातील काही मोठ्या आणि वेदनादायी विस्थापनांपैकी हे एक होते, तरीही दुर्दैवाने या हिंदूंच्या साहाय्याला त्या वेळी ना कोणी सरकार धावून आले, ना कोणी मानवाधिकार संघटना.

भीतीचे तांडव आणि हिंदूंसमोर ठेवलेले पर्याय त्या दिवशी स्थानिक वर्तमानपत्रांतील विज्ञापने, भिंतीवरील पत्रके आणि मशिदींवरील लाउडस्पीकर्समधून काश्मिरी हिंदूंना उघड धमक्या देण्यात आल्या होत्या. काश्मिरात रहायचे असेल, तर अल्ला-हो-अकबर म्हणावे लागेल, आम्हाला पाकिस्तान हवे आणि हिंदू स्त्रिया हव्यात, पण त्यांचे पुरुष नकोत, अशा




अंगावर शहारे आणणाऱ्या घोषणांनी आसमंत भरून गेला होता. आतंकवाद्यांनी हिंदूंसमोर केवळ तीनच पर्याय ठेवले होते - एकतर धर्मांतर करा, काश्मीर सोडा किंवा मरण्यास तयार व्हा. या धमक्यांना न जुमानता ज्यांनी धर्मांतर करण्यास नकार दिला, त्यांना आपल्या प्राणांची किंमत मोजावी लागली. हिंदूंनी आपली भूमी आणि मालमत्ता यांचा त्याग करून अब्रू वाचवण्यासाठी पलायन करणे स्वीकारले; परंतु जे मागे राहिले किंवा ज्यांना पळता आले नाही, त्यांच्यावर अनन्वित अत्याचार झाले.

नृशंस हत्याकांड आणि हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या घटना काश्मीरमधील हिंदूंच्या कत्तली, स्त्रियांवर झालेले बलात्कार आणि देवळांचा विध्वंस हा इतिहास लपवता येणार नाही. उधमपूर जिल्ह्यातील प्राणकोट येथील हत्याकांडाने तर क्रौर्याची परिसीमा गाठली होती. तेथे २६ निष्पाप हिंदूंची हत्या करण्यात आली, ज्यात काहींना कुऱ्हाडीने तर काहींना लाठीहल्ल्याने ठार मारण्यात आले. तत्कालीन गृहमंत्री आणि काँग्रेस नेत्यांनीही घटनास्थळी भेट देऊन याला 'पाशवी नरसंहार' म्हटले होते.

अशीच एक मन सुन्न करणारी घटना म्हणजे ८ जून १९९९ ची. अवघ्या ६ वर्षांच्या 'सीमा' नावाच्या मुलीने आपल्या डोळ्यांदेखत जे बघितले, ते कोणत्याही पाषाणहृदयी माणसालाही रडवेल. आतंकवाद्यांनी तिच्या वडिलांना आणि भावांना घरात घुसून तिच्यासमोरच हालहाल करून मारले. तिचा १३ वर्षांचा भाऊ राजिंदर याचे शीर धडावेगळे केले आणि आईला गोळ्या घातल्या. संपूर्ण कुटुंब गमावलेली ती चिमुरडी सीमा त्या दिवशी नशिबाच्या भोगवट्याला सामोरी जाण्यासाठी एकटीच उरली होती. तिच्या सांत्वनालाही तिथे कोणी नव्हते.

धार्मिक आणि सांस्कृतिक विध्वंस केवळ माणसे मारली गेली नाहीत, तर हिंदूंची अस्मिताही चिरडण्यात आली. १९९२ मध्ये अयोध्येतील बाबरी ढाचा पडल्याच्या रागातून काश्मीरमधील अनंतनाग, श्रीनगर, बारामुल्ला आणि झेलम नदीकाठची अनेक प्राचीन मंदिरे जमीनदोस्त करण्यात आली. काश्मीरमध्ये जिथे एकेकाळी वेदांचे पठण होत असे, तिथे १०३ हून अधिक सांस्कृतिक व धार्मिक संस्थांची नासधूस झाली. २० हजार घरांची जाळपोळ झाली आणि ९५ टक्के हिंदूंची घरे लुटली गेली. ९३ हजारांहून अधिक हिंदूंच्या कत्तली झाल्याचा अंदाज वर्तवला जातो. आज तिथे हिंदूंची भव्य घरे भग्नावशेषात बदलली आहेत आणि मंदिरांच्या जागी स्मशानशांतता पसरली आहे.

लपवलेले सत्य आणि 'फॅक्ट'चा लढा जगाच्या इतिहासात ज्यू आणि इतरांवर झालेल्या अत्याचारांची दखल घेतली गेली, त्यांची स्मारके उभी राहिली; परंतु स्वतःच्याच देशात निर्वासित झालेल्या काश्मिरी हिंदूंचे दुःख जगासमोर मांडायला कोणीही पुढे आले नाही. तत्कालीन निधर्मी सरकारांनी हे सत्य दडपण्याचाच प्रयत्न केला. मात्र, फ्रेंच पत्रकार श्री. फ्रान्सुआ गोतिए यांनी पुढाकार घेतला. त्यांनी 'फॅक्ट' (FACT - Fight Against Continuing Terrorism) या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून काश्मीर आणि बांगलादेशातील हिंदूंच्या अत्याचारांचे भीषण वास्तव जगासमोर मांडले. हिंदु जनजागृती समितीनेही हे प्रदर्शन देशभरात ५०० हून अधिक ठिकाणी लावून लोकांचे डोळे उघडण्याचे कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे.

हिंदूंनो, आता तरी जागे व्हा ! आज ३६ वर्षांनंतरही बहुतांश काश्मिरी हिंदू न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. काश्मीरमधील दहशतवाद आता केवळ खोऱ्यापुरता मर्यादित राहिलेला नसून तो आता देशाच्या आणि आपल्या दाराशी येऊन ठेपला आहे. १९ जानेवारीच्या निमित्ताने हे भीषण वास्तव पुन्हा एकदा मांडण्यामागचा उद्देश हाच आहे की, हिंदूंनी आता तरी गाफील राहू नये. राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यमांनी लपवून ठेवलेले हे सत्य जाणून घेऊन हिंदूंनी संघटित होणे काळाची गरज आहे. विस्थापित काश्मिरी हिंदूंच्या पुनर्वसनासाठी आणि भविष्यात असा नरसंहार पुन्हा घडू नये, यासाठी प्रत्येकाने धर्मासाठी आणि राष्ट्रासाठी कृतीशील होणे आवश्यक आहे. हीच त्या हुतात्म्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**संकलक - श्री. रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती**

# आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांना जेथे नजर कैदेत ठेवले होते ती जागा माहित आहे का ?

२९ नोव्हेंबर २०२४ या दिवशी आग्रा येथे पर्यटनासाठी गेलो होतो. दोन दिवस आधी जयपुर फिरून झाले होते. जयपूरहून निघून आग्र्याला येताना रस्त्यात फतेहपूर सिक्री बघितले. तेथील मुघल बादशाह अकबर यांचा भव्य महाल बघितला. तिथल्या गाईडच्या तोंडून अकबराच्या हिंदू पत्नी जोधाबाई यांच्यासाठी बांधलेला महाल, त्यांच्यासाठीच स्वतंत्र स्वयंपाक घर इत्यादी, इत्यादी बघून झाले.

दुसऱ्या दिवशी आग्र्याला आल्यावर प्रथम आग्र्याचा किल्ला बघितला. भरपूर भव्यदिव्य आहे. सोबत गाईड घेतलेला असल्यामुळे बरीच माहिती, छोटे छोटे बारकावे तो सांगत होता. हा किल्ला बघत असतानाच एका सुंदर अशा महालात गाईडने माहिती दिली की इथे औरंगजेबाने आपल्या वडिलांना कैदेत ठेवले होते. त्यांच्या आयुष्याची शेवटची आठ वर्षे ते इथेच कैदेत राहिले. तिथून ताजमहालाची भव्य वास्तू स्पष्ट दिसत होती. या ताजमहाला कडे बघत बघतच त्यांच्या कैदेतली वर्षे संपलीत कैदेतच त्यांचा अंत झाला..

अर्थात हा सगळा इतिहास ऐकला.

आम्ही गाईडला विचारत होते, आग्र्या मध्ये शिवाजी महाराजांना जिथे कैदेत ठेवले गेले होते ती जागा कोणती? ती आम्हाला बघायची आहे.


गाईडने उडवा उडवीची उत्तरे द्यायला सुरुवात केली होती. किल्ल्यामध्ये तर तशी कुठलीही जागा नव्हती, जिथे त्यांनी शिवाजी महाराज येथे होते असे सांगितले.

शेवटी गुगल बाबा ची मदत घेऊन गाईडला गुगल वरील लोकेशन दाखवले. 'शिवाजी महाराजांना कैदेत ठेवलेली जागा' असे गुगल वर टाकले तेव्हा ह्या किल्ल्यापासून पाच किलोमीटर वरील एक लोकेशन गुगलने दाखवले. गाईडने अर्थातच खांदे उडवले. आमच्याबरोबर येण्यासाठी त्यांनी नकार दिला. पण आमच्या मनातली जिज्ञासा संपली नव्हती.

आपण आग्र्यामध्ये दोन दिवस राहायचे, अकबर, जहांगीर यांचे राजवाडे बघायचे, शहाजहान आणि मुमताज यांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून ताजमहाला पुढे नतमस्तक व्हायचे आणि ज्या साम्राज्यामध्ये आमचा मराठी राजा शंभर दिवस कैदेत होता त्या जागेवर, त्या वास्तूमध्ये माथा न टेकता आग्रा सोडायचे हे आमच्या मनाला पटेना. गाईडला निरोप देऊन आम्ही किल्ल्याच्या बाहेर पडलो आणि गुगल लोकेशननुसार शिवाजी महाराजांच्या कैदेचे ठिकाण शोधायला सुरुवात केली.

सात जणांचा ग्रुप बरोबर असल्यामुळे आम्ही टेम्पो ट्रॅव्हलर सारखी एक मोठी गाडी केलेली होती. तीच गाडी घेऊन निघालो. आग्रा शहर एका बाजूला टाकून बाहेरच्या रस्त्याला लागलो. शहरापासून लांब नव्हता, पण शहराच्या बाहेरून जाणारा म्हणजे एखाद्या गावकुसासारखा तो रस्ता होता. लोकेशनच्या साधारण एक किलोमीटर अलीकडे आमची गाडी थांबली. पुढचा रस्ता नीरुंद आणि काटेरी झाडांनी वेढलेला होता. ड्रायव्हरने गाडीवर ओरखडे पडायला नकोत म्हणून पुढे येण्यास नकार दिला. गाडी तिथेच उभी करुन आम्ही चौघे चालत चालत त्या रस्त्याला लागलो. रस्त्याच्या एका बाजूला गावकुसा बाहेरची वस्ती जाणवत होती. रस्ता काटेरी तर होताच वर अस्वच्छही खूप होता. पायाखालच्या रस्त्याचे, रस्त्याकडेच्या घाणीचे फार काही वाटतच नव्हते, कारण ४०० मीटरच्या अंतरावर आपल्याला हवे ते ठिकाण दिसू लागले होते. शेवटी एका खूप मोठ्या इमारती जवळ आम्ही येऊन थांबलो. भले मोठे लोखंडी गेट बंद होते. आजूबाजूला झाडी वाढलेली होती.

राजा जय किशनदास भवन'✻ असे ह्या इमारतीवर नाव होते. गेट जवळ गेल्यावर एक छोटेसे फाटक नजरेत आले. त्याला कडी होती पण कुलूप नव्हते. कडी काढून सरळ आत घुसलो.



आजूबाजूला कुणीही दिसत नव्हते. गेटच्या आत मात्र स्वच्छता होती. हवेली पूर्ण बंद होती पण कोणाचातरी वावर तिथे आजूबाजूला आहे एवढे लक्षात येत होते. कुणाला काही विचारावे असे आजूबाजूला कोणी नजरेतही येईना. इतक्यात शेजारच्या वस्तीतील एक जण आमच्यासमोर आला. 'क्या चाहिये आपको?'

आम्ही थोडसं चाचरतच त्याच्याशी बोलायला सुरुवात केली. आम्ही महाराष्ट्रातून आलो आहोत आणि शिवाजी महाराजांना जिथे कैदेत ठेवले होते ती जागा बघण्यासाठी बाहेर पडलो आहोत. गुगलने आम्हाला या जागेवर आणून सोडले आहे, हे सांगताच त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. 'आप सही जगह पर आये हो' त्याच्या तोंडून हे वाक्य ऐकले आणि अंगावर सरसरून रोमांच उभे राहिले.

त्या माणसाने जी काही माहिती दिली ती अशी होती

या इमारतीला 'कोठी मीना बाजार' किंवा 'कोठी मीना बाजार हवेली' असे म्हणतात. शिवाजी महाराजांना अटक करून इथेच नजर कैदेत ठेवले होते. ९९ दिवस ते इथे होते आणि शंभरव्या दिवशी ते इथून निसटले.

मुघल राजवटीनंतरच्या काळात कोठी मीना बाजार हवेली ब्रिटिशांच्या ताब्यात होती. ब्रिटिशांनी जेव्हा त्यांची राजधानी आग्र्याहून दिल्लीला हलवली तेव्हा १८५७ मधे ही कोठी लिलावात विकली होती. राजा जय किशनदास या व्यक्तीने ती खरेदी केली होती. सध्या राजा जयकिशनदास यांचेही कुणी वारसदार या कोठीमध्ये राहत नाहीत. फक्त त्या कोठीची देखभाल करण्यासाठी एक-दोन कुटुंब आजूबाजूला आहेत. बाकी बऱ्याचशा जागेवर अतिक्रमण पण झालेले आहे. गुगल सर्च वर नंतर बरीच माहिती वाचायला मिळाली. त्यामध्ये उत्तर प्रदेश सरकारने या जागेत शिवाजी महाराजांचे स्मारक बनविण्याचा घाट घातलेला आहे. त्याला अर्थातच स्थानिक जागा बळकावणाऱ्यांनी विरोधही केलेला आहे आणि हा निर्णय कायद्याच्या आधीन आहे. त्यामुळे ही वास्तू जैसे थे अशी उभी आहे. तिथे कोणत्याही प्रकारचा बोर्ड लावण्यात आलेला नाही. फक्त ब्रिटिशांनी ही वास्तू राजा जय किशन दासला लिलावात दिल्याचा उल्लेख असलेली एक पाटी तिथे बघायला मिळाली. दरवाजे अर्थातच बंद असल्यामुळे आत जाता आले नाही. तिथेच बाहेर उभे राहून शिवाजी महाराजांच्या धैर्याला, धाडसाला आणि शौर्याला आठवत नतमस्तक झालो. डोळे भरून ती वास्तू मनात साठवली आणि परत फिरलो. चार-पाच दिवसांच्या सहलीमधे जयपूरचा हवामहल, अमेर फोर्ट, फत्तेपूर सिक्रीचा अकबराचा किल्ला, आग्र्याचा किल्ला, ताजमहाल हे सगळं बघत फिरत होतो. पण या ट्रिप मध्ये खरे समाधान वाटले ते मीना बाजार कोठीची इमारत बघून.

इथे लवकरच शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे आणि आग्र्यात जाणाऱ्या तमाम मराठी माणसाची पाऊले इकडेही आधी वळावीत असे मनोमन वाटले. या मीना बाजार कोठी पर्यंत पोहोचता आले याबाबत खूप समाधान वाटले.

पूर्वी आग्रा फिरताना हा इतिहास आपल्याला आठवलाही नव्हता याची खंत सुद्धा वाटली.

असो.

आपणही कधी आग्रा येथे गेला तर जरूर जरूर या पवित्र वास्तूला भेट द्या.

अफझलखानाच्या मृत शरीराचा व कबरीचा मागोवा

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी शके १५८१ म्हणजे १० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजी महाराजांनी अफझलखान नावाचा ३२ दातांचा बोकड फाडला..

अफझलखान वधानंतर त्याच्या मृत शरीराचे नेमके काय करण्यात आले, त्याचे शव इस्लाम धर्मानुसार पुरण्यात आले, त्याची कबर बांधण्यात आली कि अन्य काही ? इतिहासातील तत्कालीन व उत्तरकालीन संदर्भ साधनात याविषयी काय माहिती येते याविषयीचा एक आढावा.....

अफझलखान खान मारला गेला परंतु त्याच्या देखाचे तुकडे झाले होते समकालीन शिवाभारतार्तील नोंदीनुसार : एकीकडे धड पसरले. एकीकडे आतडी गळली , एकीकडे मस्तक पडले. एकीकडे पटका पडला, छत्री एकीकडे उडाली. चवरीही एकीकडे गेली, सर्व प्रकारच्या मोत्यांच्या व रत्नाचा तो शीरपेचही एकीकडे पडला. , वस्त्र एकीकडे तर छत्र एकीकडे, अशी दश प्राप्त होऊन तो दुष्ट आपल्याच कार्मामुळे भूमीवर लोळला.

विश्वसनीय मानल्या जाणाऱ्या सभासद बखरीतील नोंदीनुसार ( लेखनकाळ १६९७ ) **पान ३ वर**



वसुंधरा नगर, जालना येथील महिला मंडळातर्फे मा. श्री. भास्कर आबा दानवे यांची नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल यथोचित सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# शिंदेची बार्गेनिंग पॉवर वाढली; मुंबईत महापौर कोण?

**मुंबई -** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मुंबईतील नगरसेवकांना संपर्क साधला जात असल्याची चर्चा आहे. ठाकरेंच्या संपर्कामुळं शिवसेनेचे नगरसेवक मुंबईतील ताज लँडस मध्ये ठेवण्यात आले आहेत. ठाकरेंच्या हालचालींमुळं शिंदेंना धोका किंवा संधी मिळेल, अशा चर्चा सुरु आहेत. बार्गेनिंग पॉवर वाढल्यानं एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून भाजपकडे महापौर पदाची मागणी करण्यात आल्याच्या चर्चा आहेत. स्थायी समितीसह इतर समित्यांसाठी देखील शिवसेना आग्रही राहू शकते. मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालानं एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर वाढल्याचं दिसून येत आहे. एकनाथ शिंदे मुंबई महापौरपदाची मागणी करण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी भाजपला शिवसेनेची गरज आहे. भाजपकडे सध्या ८९ नगरसेवक आहेत तर शिंदेंच्या शिवसेनेकडे २९ जागा आहेत. मुंबई महापालिकेत २२७ जागा असल्यानं बहुमतासाठी ११४ संख्याबळ आवश्यक आहे. यामुळं भाजपला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची गरज असल्याचं दिसून येतं. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं ९२ जागा लढल्या होत्या. यामध्ये २९ नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपचे ८९ नगरसेवक मुंबई महापालिका निवडणुकीत विजयी झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसनं २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा एक नगरसेवक विजयी झाला आहे. शिवसेना ठाकरे पक्षाचे ६५ नगरसेवक विजयी झाले.

व्यापारी महासंघाचे नवनियुक्त कार्यकारिणीचा सत्कार

## शहरातील व्यापाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण व्यापाऱ्यांच्या ठामपणे पाठीशी

भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील व्यापाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून ठामपणे पाठीशी असून कुठल्याही समस्ये संदर्भात व्यापाऱ्यांना आपले दरवाजे उघडे असल्याचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले

परतूर शहरातील व्यापारी महासंघाच्या नूतन कार्यकारणीच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, शहरात अनेक समस्या आहेत त्यात अनेक व्यापाऱ्यांना छोट्या मोठ्या गोष्टींचा सामना करावा लागतो या संपूर्ण समस्यांचे उच्चाटन करून परतुर शहर नगरपालिका ही सुंदर नगरपालिका स्वच्छ नगरपालिका आदर्श नगरपालिका घडवण्याचा आपला संकल्प असून आपल्या सर्वांच्या साथीने या कामासाठी आपण सदैव प्रयत्न करत राहू असे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी नूतन कार्यकारिणीचे अध्यक्ष राजेश मस्के उपाध्यक्ष गौतम कोटेच्या उपाध्यक्ष अनिल वाशिंबे, सचिव राजेंद्र कादे सहसचिव मुकेश अग्रवाल यांचा पुष्पहारणे सत्कार करण्यात आला यावेळी भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, भाजपा नेते संदीप बाहेकर, गटनेते प्रकाश चव्हाण, नगरसेवक सोनू अग्रवाल, नगरसेवक सावता काळे, नगरसेवक सतीश सोनवणे , नगरसेवक इजरान कुरेशी, दिलीप होलानी, सुबोध चव्हाण अर्जुन जगताप मुन्ना चितोडा, ज्ञानेश्वर जईद, प्रमोद राठोड मुज्जू कायमखानी मलिक कुरेशी कृष्णा आरगडे विजय यादव, नरेश कांबळे, इंद्रजीत हिवाळे संतोष हिवाळे यांच्यासह शहरातील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## अखिल भारतीय मराठी पत्रकार संघातर्फे दर्पण दिन साजरा

**जालना । प्रतिनिधी -** मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ अखिल भारतीय मराठी पत्रकार संघातर्फे दर्पण दिन १० जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार बाबुराव व्यवहारे तर प्रमुख पाहूणे म्हणून सामाजिक कार्यकर्ता तुलजेस चौधरी हे होते. यावेळी तुलजेस चौधरी यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी मोलाचं कार्य केलं असं ते म्हणाले.

# दोघा विद्यार्थ्यांची भारतीय संरक्षण पोलीस दलात निवड

## धुणे भांडे करणाऱ्या आईची कथा सांगताना पानावले डोळे

**दिंडोरी । प्रतिनिधी -** दिंडोरी शहरातील अरुणोदय सार्वजनिक वाचनालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी गरिबीवर मात करत भारतीय संरक्षण पोलीस दलात प्रवेश केला असून दोघांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दिंडोरी येथील अरुणोद्य सार्वजनिक वाचनालयात शिकणारे विशाल गांगोडे व भूषण बेंडकुळे या दोघांनी यश संपादन केले आहे. दोघांनीही गेल्या दोन वर्षांपासून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला होता. भूषण बेंडकुळे हा नाईकवाडी ता. नाशिक येथील असून वडील आणि आई दोघेही हमालीचे काम करायचे. वडील हमाली करायचे तर आई दुसर्यांच्या घरी धुणी भांडे करून भूषणला अभ्यासासाठी पैसे पाठवायचे. त्याने आईचे कष्ट पाहिले होते. वडिलांचे कष्ट पाहिले होते. त्यामुळे यश मिळवायचे असा निश्चय केला होता. दुसरा विद्यार्थी विशाल अर्जुन गांगोडे हा वाघाड येथील विद्यार्थी असून त्याने दोन वर्षांपासून दिंडोरी शहरात येऊन अभ्यास केला. सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत लायब्ररीमध्ये अभ्यास करायचा. घरची परिस्थिती जेमतेम असल्याने त्यांनी बराच खर्च टाळला. त्याचबरोबर त्याचे वडील शेतीकाम करून त्याला पैसे पुरवायचे. त्यांची निवड केंद्रीय राखीव पोलीस दलात झाली आहे. दोघांचाही अरुणोदय सार्वजनिक वाचनालयाचे संचालक तथा दिंडोरी नगरपंचायतीचे नितीन गांगुर्डे व ज्येष्ठ पत्रकार अशोक केंग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अशोक केंग यांनी दोघांनाही शुभेच्छा दिल्या. दोघे विद्यार्थ्यांच्या कष्टाची जाणीव ही महत्त्वपूर्ण ठरली असून इतर विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून यश मिळवावे असे आवाहन वाचनालयाचे संचालक तथा नगरसेवक नितीन गांगुर्डे यांनी केले. भूषण बेंडकुळे व विशाल गांगोडे यांनी दोघांनी अरुणोद्य वाचनालयाचे आभार मानले व आपला कष्टाचा प्रवास सांगताना त्यांना आई-वडिलांचे कष्ट आठवले ते सांगत असतानाच दोघांच्या डोळ्यात पाणी आले यामुळे वातावरण भारावून गेले होते संयोजन ग्रंथपाल सोमनाथ थोरात यांनी केले यावेळी वाचनालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

भूषण बेंडकुळे व विशाल गांगोडे हे दोघेही सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आहेत. भूषण हा नाशिक तालुक्यातील नाईकवाडी येथील रहिवासी आहे त्याचे वडील हमारी काम करतात तर आई घर भांडी धुणे काम करायचे मुलगा शिकून मोठा व्हावा नोकरीला लागावा हे आई वडिलांचे स्वप्न होते भूषण ची आई धुणे भांडे कडून त्याला शिक्षणासाठी पैसे पुरवायची या कष्टाची जाणीव भूषण ने ठेवले व त्यांनी यश मिळवले तेच गोष्ट विशाल बाबतीतही झाले विशाल हा शेतकरी कुटुंबातून आहे आई-वडील सतत राहतात त्याला शेतीचा त्रास होऊ नये यासाठी त्याला मदत केली. या दोघे विद्यार्थ्यांची संरक्षण खात्यात निवड झाली सत्कार झाल्यानंतर दोघांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळेस आई-वडिलांच्या कष्टाची कथा सांगताना दोघांचाही उर भरून आला व डोळ्यात पाणी आले दोघांनाही बोलता आले नाही त्यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली व अरुणोदय वाचनालयाचे आभार मानले. सहकार्य केल्याबद्दल संचालक नितीन गांगुर्डे तसेच प्रमुख पाहुणे अशक्य अशोक केंग यांच्या पाया पडल्या व आभार मानले. यावेळी अभ्यासकेतील विद्यार्थ्यांचे सुद्धा डोळे पानावले होते.



पान १ वरुन

## आग्रा येथे ...

अफझलखान खासा मारून शीर कापून नेले. कुल लष्कर लुटून फस्त केले.

समकालीन व विश्वसनीय मानल्या जाणाऱ्या जेधे करीण्यात याबाबत पुढीप्रमाणे उल्लेख येतो अफझलखानाच्या सिरास पिंजरा करून त्यात घालून राजगडाच्या बालेकील्याच्या दरवाजीयावर कोनाडीयात ठेवावयास पाठविले. पूजा नैवेद्य चालविला

सदर विश्वसनीय नोंदीनुसार अफझलखानाचे फक्त शीर ( डोके ) राजगडावर पुरण्यात आले व तेथे दिवबत्तीची सोय शिवाजी महाराजांनी केली.

अफझलखानाची प्रतापगडावरील कबर

प्रतापगडावर सद्यस्तिथीत अफझलखानाची कबर आढळून येते. सदर कबरीचे इतिहासात विश्वासहार्य संदर्भ आढळून येत नाहीत. परंतु उत्तरकालीन शेडगावकर भोसले बखरीतील नोंदीनुसार : शिवाजी राजे प्रतापगडावर गेले. नंतर अफझलखान याचे शीर बुरजात पुरून टाकविले त्या दिवसापासून बुरजाचे नाव अब्दुला बुरुज ठेविले त्याचे धड कचेरी लगत दफनावून कबर बांधवीली. व सैद बडा पटाइत यास दफनावून टाकीला.

सदर शेडगावकर बखर हि उत्तरकालीन असून त्यातील विश्वसनीय नाही. सदर बखरीचा लेखनकाळ १८५४ म्हणजे शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर १७४ वर्षांनी लिहिलेली बखर इतिहास संशोधक वा सी बेंद्रे लिहितात : सभासद , चिटणीस व कलमी बखरी बऱ्या आहेत. छोटी बखर माहितीपूर्ण आहे. परंतु शेडगावकर बखर व शिवदिग्विजय अगदीच टाकावू असून बनावट भारुडांनी भरलेल्या आहेत.

अफझलखानाच्या पार्श्वभागात मेख लोखंडाची

उत्तरकालीन ९१ कलमी बखर लेखनकाळ १७०२ भारतवर्ष व राजवाडे प्रत कलम ३५ मधील नोंदीनुसार श्री तुळजापूरास उपद्रव श्री भवानीस केला म्हणोन गांडीत मेख लोखंडाची तावून सर दर्वजावरी बांधिले.

तुळजाभवानी हे छत्रपती भोसले घराण्याचे कुलदैवत सदर तुळजाभवानी मंदिरास अफझलखानाने त्रास दिला असे वर्णन आपणास समकालीन व विश्वसनीय शिवभारत व सभासद बखरीत आदळून येते. शिवभारतातील नोंदीनुसार :- निशुभाप्रमाणे तेजस्वी अशा ज्या दुष्टाने तुळजापूरच्या भवानीचा मोठा अपमान केला.

यज्ञासाठी दुध व तूप हे हविद्रव्य पुरवण्याकरिता ब्रम्हदेवाने गाई निर्माण केल्या आहेत. त्यांना हा तामसी अफझलखान अरेरे ! प्रतिदिवशी ठार मारून सर्वच धर्म उलथून टाकू इच्छित आहे.

सदर नोंदीनुसार अफझलखान गाईच्या हत्या करीत आणि कुलदैवत भवानी मंदिरास त्रास देत स्वराज्यावार चालून येत होता. त्यामुळे अफझलखान मारल्यावर शिवाजी महाराजांनी त्याचे मुंडके छाटल्यानातर त्याच्या पार्श्वभागात लोखंडाची मेख मारली असण्याची शक्यता आहे.

शिंवभारतातील नोंदीनुसार :- शिवाजी महाराजांनी कल्याण भिवंडी काबीज केल्यानंतर यवनांच्या मशिदी जमीनदोस्त केल्या.

शिवचरित्र सहित्य खंड ८ ले.४९ व राजव्यवहारकोश या मधील नोंदीनुसार दक्षिण दिग्विजयाच्या वेळी शिवाजी महाराजांनी तीरुवन्नमलाईचे मंदिर मुस्लीम आक्रमणकर्त्यांनी उध्वस्त केले होते त्या जागी मशीद बांधली होती. सदर मशीद पाडून शिवाजी महाराजांनी परत मंदिराची निर्मिती केली ,

सदर समकालीन नोंदीनुसार शिवाजी महाराजांनी मशिदी पाडल्या त्यामुळे कुलदैवत भवानीस व गाईंच्या हत्या करणाऱ्या अफझलखानाच्या पार्श्वभागात लोखंडाची मेख मारली असावी.

अफझलखानाची प्रतापगडावरील कबर

सदर माहिती इतिहास अभ्यासक सत्येन वेलणकर यांच्या लेखातील आहे .

१८८५ च्या सातारा जिल्हा गँझेटियर मध्ये अफजलखानाच्या कबरीचा उल्लेख देखील नाही. (झरसश ५४५`पुरीवी )

१९१६ साली द.बा.पारसनीस यांनी घेतलेल्या छायाचित्रात एका छोट्या तात्पुरत्या मांडवाखाली उभ्या केलेल्या थडगेसदृश्य आकृतीला अफजलखानाचे थडगे म्हणून दाखवण्यात येते (इथेही सय्यद बंड्याचा पत्ताच नाही !)

१९६३ च्या सातारा जिल्हा गँझेटियर मध्ये मध्ये फक्त अफजलखानाच्या कबरीचा उल्लेख. (झरसश८७५ १९६३ ऋॠर्शीशशी) सय्यद बंडाच्या कबरीचा उल्लेख नाही.

हजरत मोहम्मद अफजलखान मेमोरियल ट्रस्ट इथे उरुसाचे आयोजन करते .

सदर संदर्भ साधनातील माहितीच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखान व सय्यद बंडा यांच्या कबरी प्रतापगडावर बांधल्याचे कोणतेही तत्कालीन किंवा उत्तरकालीन विश्वसनीय संदर्भ नाहीत अफझलखानची कबर ही इ.स. १९०० सालानंतर बांधली गेली आहे, तर सय्यद बंड्याची कबर १९७० नंतर बांधली गेली आहे

लेखन आणि संकलन :- श्री नागेश मनोहर सावंत देसाई

संदर्भ :- साधन चिकित्सा :- वा सी बेंद्रे

जेधेकरीना :- अ.रा.कुलकर्णी

सभासद बखर , शिवभारत , शिवचरित्र सहित्य खंड ८ , राजव्यवहारकोश

९१ कलमी बखर

## संक्रांतीला पुस्तकांचे वाण: वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी प्रा.अनुसया जाधव यांचा आगळा उपक्रम



**परतूर । प्रतिनिधी -** समाज माध्यमांच्या जाळ्यात गुरफटलेली युवा पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. मराठी साहित्यातील अमूल्य ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होण्यासाठी नवी पिढी जाणीवपूर्वक वाचनाकडे वळली पाहिजे.घरातील महिलेने याबाबत आपल्या घरातून सुरुवात केल्यास आपली मुले वाचनाकडे वळतील. यासाठी महिलांना वाचन संस्कृतीचे महत्व पटवून देण्याच्या उद्देशाने येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयातील प्रा. अनुसया जाधव यांनी संक्रांतीला पुस्तकांचे वाण हा उपक्रम हाती घेतला आहे. हळदी कुंकवाला आलेल्या प्रत्येक महिलेला पुस्तकाचे वाण देऊन वाचन संस्कृती जपण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन त्या करतात.या माध्यमातून महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, आपल्या मुलांना वाचनासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रोत्साहित करावे या हेतूने मागील दोन वर्षांपासून हा उपक्रम आपण राबवत असल्याचे प्रा. जाधव सांगतात.

माहिती तंत्रज्ञानाचा युगात प्रत्येकजण आपापल्या कामात व्यस्त आहे. कामाच्या व्यतिरिक्त वेळेत बहुतांश जण समाजमाध्यमांमध्ये गुरफफटलेले आढळून येतात.यामुळे वाचन संस्कृती लुप्त होत चालली आहे.येणारी नवी पिढी आभासी जगात वावरत असून आपली संस्कृती विसरत चालली आहे. घरातील महिलानी ठरवले तर त्या आपल्या मुलांना वाचनाकडे वळवू शकतात. यासाठी सर्व प्रथम घरातील महिलेला वाचनाची आणि मराठी साहित्याची आवड निर्माण होणे गरजेचे आहे. संक्रातीला पुस्तकाचे वाण देऊन महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

१४ जानेवारी रोजी सामूहिक हळदी - कुंकू कार्यक्रमात या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.मराठी संहित्याला दिवाळी अंकांची मोठी परंपरा आहे. अनेक साहित्यिकांच्या लेखनाची सुरुवातच दिवाळी अंकांपासून झाली आहे. दिवाळी अंकात महिलांच्या आवडीचा असणाऱ्या पाककृती, सौन्दर्य विषयक टीपांचा समावेश असतो. शिवाय सोप्या आशयाच्या कथा, कवितांचा समावेश असतो. थोडक्यात, दिवाळी अंकाच्या वाचनातून वाचनाची निर्माण व्हावी, साहित्याची ओळख व्हावी म्हणून वाण देण्यासाठी दिवाळी अंकाची निवड केल्याचे जाधव सांगतात. संक्रातीला मिळालेले वाण त्यात अधिकची भर घालून पुढे पाठवण्याची प्रथा आहे. मिळालेल्या पुस्तकाच्या वाणात अधिकची वाढ होऊन ते अधिकाधिक महिलांपर्यंत पोहचेल. शहरातील महिलांनी यात पुढाकार घेण्याची गरज आहे. आमच्या या उपक्रमातून अधिकाधिक महिलांपर्यंत हा विचार पोहचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मराठीत अनेक दर्जेदार साहित्य उपलब्ध आहे. या साहित्याची ओळख नव्या पिढीला करून देण्यासाठी या सारख्या उपक्रमाची आवश्यकता आहे. नव्या पिढीला मराठीतील साहित्याची ओळख झाल्यास नवी पिढी पुन्हा समाज माध्यमांकडून पुस्तकांकडे वळू शकेल. कोणी एकट्याने नाही तर समाजातून समूहिकरीत्या जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत.

**- डॉ. शरद बोराडे, मराठी साहित्याचे अभ्यासक**

नवी पिढी वाचत नाही अशी ओरड कायम एकायला मिळते. ही तक्रार करतांनाच त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुढाकार मात्र घ्यायला सहसा कोणी धजावत नाही. पुस्तकाचे वाण हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविल्यास त्याचा फायदा निश्चितपने वचन चळवळ गतिमान होण्यास मदत होईल. मराठी ज्ञान भाषा होण्यासाठी सर्वप्रथम तिची गोडी मराठी माणसात निर्माण व्हायला हवी.

**- डॉ.अशोक पाठक, सुप्रसिद्ध कवी**

जालना अतिवृष्टी अनुदान घोटाळा

# उच्च न्यायालयाने जामीन फेटाळला

## आरोपींना आता पोलिसांना शरण जाण्याशिवाय पर्याय नाही!

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात गाजलेल्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यातील संशयित आरोपींच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या प्रकरणातील आरोपींनी अटकेपासून वाचण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती, मात्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावल्याने त्यांना मोठा धक्का बसला आहे. आता या आरोपींसमोर पोलिसांना शरण जाण्याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नाही.

**नेमके प्रकरण काय?**

जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचे अनुदान जाहीर केले होते. मात्र, हे अनुदान वाटप करताना महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांनी संगनमत करून अपात्र व्यक्तींच्या खात्यावर पैसे वळवले. कागदपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार करून शासकीय निधीचा अपहार केल्याचा ठपका ठेवत याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते.

**न्यायालयाने काय म्हटले?**

घोटाळ्याचे गांभीर्य आणि तपासातील पुराव्यांचा विचार करता, आरोपींना अटकपूर्व जामीन देणे तपासात अडथळा ठरू शकते, असे मत न्यायालयाने व्यक्त केल्याचे समजते. उच्च न्यायालयाने जामीन फेटाळल्यामुळे तपास यंत्रणेला आता आरोपींना अटक करण्याचे मार्ग मोकळे झाले आहेत.

**आरोपींची कोंडी आणि पोलिसांची कारवाई**

गेल्या अनेक दिवसांपासून हे आरोपी अटकेच्या भीतीने फरार होते किंवा कायदेशीर मार्गांचा अवलंब करून अटक टाळण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, सर्वोच्च कायदेशीर पर्यायांपैकी एक असलेल्या उच्च न्यायालयानेही दिलासा नाकारल्याने आता आरोपींची मोठी कोंडी झाली आहे. पोलिसांचे पथक आता या आरोपींच्या शोधात असून, कोणत्याही क्षणी मोठी अटक सत्र सुरू होण्याची शक्यता आहे. महत्त्वाची बातमी: महसूल विभागातील 'त्या' कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, या घोटाळ्यातील आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांच्या मुलाची सीआयएसएफ पदी निवड झाल्याबद्दल सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील मानेगाव वाडी तांडा येथील माजी ग्रामपंचायत सदस्य शाम पवार यांचे दोन्ही सुपुत्र गोकुळ व अर्जुन पवार यांच्यासह सुनिल मधुकर जाधव यां तिघांची उखडऋ पोलीस पदी निवड झाली आहे.याबददल त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात केला.यावेळी पंचायत समिती सदस्य मुकेश चव्हाण,पोलीस पाटील अंकुश बीलोरे,सरपंच ज्ञानेश्वर राठोड,उपसरपंच दत्ताभाऊ जाधव,मोहिते सर,संतोष राठोड, मगर,फुके ,गोरख पवार याच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# अभिनेत्री सोनाली कुलकर्णी उद्या जानोरीत

**दिंडोरी । प्रतिनिधी -** दिंडोरी तालुक्यातील जानोरी गाव हे मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भाग घेतल्यामुळे या गावात मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत अनेक विकास कामे तसेच गावातील रस्ते सुशोभीकरण, गावातील घरांच्या भीतीन वर रंगरंगोटी करून माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे तसेच गावातील घरांच्या पुढील ओटे गुलाबी कलर ने रंगविले आहे त्यामुळे गावातील गल्लीबोळ अतिशय सुंदर व देखणे दिसत आहे. तसेच गावातील महात्मा फुले विद्यालय व जिल्हा परिषद शाळा येथे वृक्षारोपण करून विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. गावातील अंगणवाड्यांना विविध चित्रकरण करून तसेच अंगणवाड्यां समोर परसबाग तयार करण्यात आले आहे. ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभा गृह नवीन बनवण्यात आला आहे तसेच ग्रामपंचायत तर्फे वाचनालय तयार करण्यात आले आहे. गावात प्रत्येक दुकानात व घराघरात प्लास्टिक व गुटखाबंदी करण्यात येत आहे. बाणगंगा नदीचा घाट व परिसर साफसफाई करण्यात येत आहे. उद्या सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या जानोरी गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियांतर्ग गावच्या विकास सक्रिय सहभाग घेण्यासाठी येणार असून त्यांच्या हस्ते विविध उदघाटन करण्यात येणार आहे.त्यामुळे गावात विविध प्रकारचे कार्यक्रम ठेवण्यात आले आहे. यामध्ये प्रत्येक घरासमोर ग्रामस्थांनी पाण्याचा सडा मारून रांगोळी काढण्यात येणार आहे. तसेच महात्मा फुले विद्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या स्वागतासाठी सांस्कृतिक कार्यक्रम ठेवला आहे. तसेच ग्रामपंचायत तर्फे ढोल ताशा व बैलगाडीत मिरवणूक काढण्याचे नियोजन करत आहे. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियान अंतर्गत जानोरी गावात विविध प्रकारचे कार्यक्रम तसेच नियोजन करण्यात येत आहे. याबाबत दिंडोरीचे गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे व सहाय्यक गटविकास अधिकारी वेंगे हे दररोज जानोरी गावात भेट देऊन ग्रामपंचायतीला विविध प्रकारचे मार्गदर्शन करत आहे. मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायत अभियानांतर्गत जानोरी गावात विविध प्रकारचे कार्यक्रम घेण्यात येत आहे त्यामध्ये माझी वसुंधरा अभियान राबवण्यात येत आहे. प्लास्टिक व गुटखाबंदी करण्यात येत आहे. गावातील रस्ते सुशिबी करण करण्यात येत आहे. गावातील विद्यालय जिल्हा परिषद शाळा अंगणवाड्या या विविध प्रकारचे कार्यक्रम घेण्यात येत आहे. तसेच हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या उद्या जानोरी गावात येणार असून अभियाना अंतर्गत माहिती देणार आहे.

# १४ खेळाडू राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी पात्र

**जालना । प्रतिनिधी -** विरार (मुंबई) येथे दिनांक ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झालेल्या २ री स्टेअर्स युथ गेम्स महाराष्ट्र राज्य कराटे चॅम्पियनशिप २०२५-२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत जालना जिल्ह्यातील कराटे खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील तब्बल १८ जिल्ह्यांतील ५०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

जालना जिल्ह्यातून २८ काता व कुमिते इव्हेंटमध्ये खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यापैकी १४ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण २५ पदके पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

यामध्ये १५ सुवर्ण, ७ रौप्य व ३ कांस्य पदकांचा समावेश आहे. या भव्य स्पर्धेचे अध्यक्षपद शिहान राज कपूर बागडी यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून गुजरात स्टेअर्सचे प्रमुख श्री. विनोद बामणीया, फिल्म डायरेक्टर व कास्ट डायरेक्टर श्री. विक्रांत राणा, आयोजक महाराष्ट्र राज्य स्टेअर्सचे प्रमुख व नॅशनल कमिटी मेंबर श्री. विशाल जाधव तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे चीफ कराटे को-ऑर्डिनेटर उपस्थित होते.




**राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेले खेळाडू**

एप्रिल महिन्यात दिल्ली येथे होणाऱ्या स्टेअर्स युथ गेम्स राष्ट्रीय कराटे स्पर्धेत जालना जिल्ह्यातून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू पुढीलप्रमाणे -

कु. निवांशी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) अंडर-१० । वजन -३० किलो काता - १ ला क्रमांक, कुमिते - २ रा क्रमांक.

कु. अनुष्का किशोर म्हेत्रे (नवयुवक गणेश माध्यमिक विद्यालय, जालना) अंडर-१४ । वजन -५५ किलो काता - १ ला क्रमांक, कुमिते - २ रा क्रमांक.

कु. तन्वी नितीन खरटमल (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) अंडर-१४ । वजन -४० किलो काता - १ ला क्रमांक,

कु. आरुषी नवीनकुमार वलकट्टी (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) अंडर-१४ । वजन -५० किलो काता - १ ला क्रमांक.

कु. वैष्णवी बाबासाहेब लोखंडे (पोड्दार इंटरनॅशनल स्कूल, जालना) अंडर-१६ । वजन -५० किलो काता - ३ रा, कुमिते - ३ रा.

कु. आकांक्षा शंकर चिल्का (श्री म. स्था. जैन विद्यालय, जालना) अंडर-१६ । वजन -५० किलो काता - २ रा क्रमांक.

कु. वैष्णवी संतोष लुटे (राष्ट्रीय हिंदी विद्यालय इंग्लिश मीडियम, जालना) अंडर-१६ । वजन -५५ किलो काता - १ ला, कुमिते - २ रा.

कु. दिव्यता अजितराज कोठारी (श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूल, जालना) अंडर-१६ । वजन -६० किलो काता - १ ला, कुमिते - १ ला.

कु. लावण्या किशोर गुडला (जेईएस कॉलेज, जालना) अंडर-१८ । वजन -५० किलो काता - १ ला, कुमिते - १ ला,

कु. पूर्वा सुजित माने (श्रीमती इंदिरा गांधी कॉलेज, रामनगर जालना) अंडर-१८ । वजन +६५ किलो काता - १ ला, कुमिते - १ ला.

ऋषिकेश गणेश श्रीराम (नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना) अंडर-१० । वजन -३० किलो काता - १ ला, कुमिते - २ रा.

यशवर्धन शंकर चिल्का (श्री म. स्था. जैन इंग्लिश स्कूल, जालना) अंडर-१४ । वजन -५० किलो काता - २ रा, कुमिते - ३ रा

नयन धनराज गोमतीवाले (जेईएस कॉलेज, जालना) अंडर-१८ । वजन -४५ किलो काता - १ ला, कुमिते - १ ला.

शेलमॉन योहान गुडेकर (जेईएस कॉलेज, जालना) अंडर-१८ । वजन -५० किलो काता - २ रा, कुमिते - १ ला.

या सर्व खेळाडूंना जालना जिल्ह्याचे चीफ को-ऑर्डिनेटर सेन्साई रूपेंद्र पारचा व प्रशिक्षक सेन्साई अमन पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्टेअर्स जालना जिल्ह्याचे अध्यक्ष दीपक शेळके, उपाध्यक्ष गणेश श्रीराम, प्रशांत पेम्बार्ती, महावीर ढक्का, राहुल मांडोत, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक व पालकवर्ग यांनी खेळाडूंचे मनापासून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या १४ खेळाडूंनी राज्यस्तरीय स्पर्धेत यश संपादन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरत जालना जिल्ह्याचा मान उंचावला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळाली असून भविष्यातही हे खेळाडू देशपातळीवर यश संपादन करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# 'हिंद-दी-चादर'चा विचार प्रत्येक घरापर्यं त पोहोचवा

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे निर्देश; ऐतिहासिक सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

**नांदेड -** शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या ऐतिहासिक 'शहीदी समागम' सोहळ्याचे विचार खेडोपाडी आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचले पाहिजेत,असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी नांदेडमध्ये होणाऱ्या या भव्य सोहळ्याच्या प्रसिद्धी कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीत श्री.पापळकर यांनी प्रसिद्धी यंत्रणेला मार्गदर्शन केले.गुरुजींचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पारंपरिक पद्धतींसोबतच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर त्यांनी भर द्या, असेही ते म्हणाले.

शिक्षण विभागासह विविध माध्यमांचा प्रभावी वापर* कार्यक्रमाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी शिक्षण विभागाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे श्री.पापळकर यांनी नमूद केले. शाळांच्या माध्यमातून प्रभात फेरी, निबंध, चित्रकला, प्रश्नमंजुषा आणि समूहगान असे उपक्रम राबवून विद्यार्थी व पालकांपर्यंत कार्यक्रमाचा संदेश पोहोचवावा. तसेच,शासकीय कार्यालये, पेट्रोल पंप आणि सार्वजनिक ठिकाणी होर्डिंग्ज लावून वातावरण निर्मिती करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

**सोशल मीडियाचा प्रभावी वापर करा**

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी नियोजनावर भर दिला.ते म्हणाले,की मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांसोबतच सोशल मीडियाचा (समाज माध्यमे) प्रभावी वापर करून राज्यासह राज्याबाहेरही या कार्यक्रमाची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे.

**१० लाख भाविकांची उपस्थिती; आंतरराष्ट्रीय महत्त्व**

हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी समागम राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक ऑनलाईन माध्यमातून म्हणाले, की हा कार्यक्रम देश-विदेश पातळीवर अत्यंत महत्त्वाचा आहे.या महासोहळ्यात केवळ शीख समाजच नव्हे,तर सिकलीगर,बंजारा,लबाना, सिंधी,मोहयाल,वाल्मिकी,उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज आदी समाजासह इतर समाज असे मिळून सुमारे १० लाख भाविक सहभागी होणार आहेत.त्यामुळे प्रसिद्धीची व्याप्ती मोठी असावी.

**यांची होती उपस्थिती**

या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर,शहीदी समागम समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, लातूर विभागाचे समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे माध्यम समन्वयक संतोष आंधळे, छत्रपती संभाजीनगर माहिती विभागाचे प्र.उपसंचालक प्रशांत दैठणकर,जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने (छत्रपती संभाजीनगर),अरुण सूर्यवंशी



प्र.माहिती उपसंचालक विवेक खडसे आणि नांदेड-परभणीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, लातूर प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप,हिंगोली प्र.जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते लातूर विभागाचे सहायक संचालक (माहिती) डॉ.श्याम टरके प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच ऑनलाईन माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी समागम राज्य समन्वय (जालना),गोपाळ साळुंखे (धुळे), सुनील सोनटक्के (सोलापूर), डॉ. रवींद्र ठाकूर (जळगाव),विभागीय संपर्क अधिकारी श्रद्धा मेश्राम आणि छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहायक संचालक गणेश फुंदे यांनी सहभाग नोंदविला.

सर्व जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी यावेळी आपापल्या जिल्ह्यातील प्रसिद्धी नियोजनाची सविस्तर माहिती सादर केली.

जालन्यात थरार!

# शेतात टेहळणीसाठी गेलेल्या शेतकऱ्यावर दरोडेखोरांचा सशस्त्र हल्ला

## २ तोळे सोने आणि रोकड लंपास

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील थार येथे एका शेतकऱ्यावर दरोडेखोरांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात विनोद भास्करराव शिंदे हे शेतकरी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर सध्या जालना येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, घटनेला वेळ उलटूनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने परिसरात संतापाचे लाट उसळली आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, विनोद शिंदे हे नेहमीप्रमाणे रात्री ८ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात पिकाची टेहळणी करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांना शेतात तोंडाला रुमाल बांधलेले ७ ते ८ संशयित तरुण वावरताना दिसले. शिंदे यांनी धैर्याने त्यांना हटकले असता, दबा धरून बसलेल्या दरोडेखोरांनी त्यांच्यावर अचानक सशस्त्र हल्ला चढवला.

चाकूने वार करून केली लूटमार

दरोडेखोरांनी शिंदे यांच्यावर चाकूने वार करत त्यांना जखमी केले. त्यानंतर त्यांच्या खिशातील २० हजार रुपयांची रोकड आणि दोन सोन्याच्या अंगठ्या जबरदस्तीने काढून घेतल्या. एवढ्यावरच न थांबता, दरोडेखोरांनी शिंदे यांचे हातपाय बांधून त्यांना शेतात टाकले आणि तिथून पळ काढला.

पोलीस प्रशासनावर ताशेरे

जखमी अवस्थेत शिंदे यांनी '११२' क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.

सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र, या घटनेबाबत संताप व्यक्त करताना विनोद शिंदे म्हणाले की:

दरोडेखोरांनी मला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मी पोलिसांना सर्व माहिती दिली आहे, मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. हल्लेखोर मोकाट फिरत असून मला तातडीने न्याय मिळावा.

**परिसरात भीतीचे वातावरण**

या घटनेमुळे थार आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली आहे. रात्री-अपरात्री शेतात जाणे आता असुरक्षित बनले आहे. जालना तालुका पोलिसांनी दरोडेखोरांचा शोध सुरू असल्याचे सांगितले असले तरी, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.